बुधवार दि.०८ मे २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २५१
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com


# निर्यातबंदी करून शेतकऱ्यांना नुकसानीत टाकण्याचे पाप सरकारने केले-जयंत पाटील

## बीडची निवडणूक जनतेने हाती घेतली-अमोल कोल्हे





लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

बीडची निवडणुक जनतेने हाती घेतली असून येथील जनता ही स्वाभिमानी आहे.परंतु काही राजकीय व्यक्ती स्वतःच्या स्वार्थासाठी आपला स्वाभिमान गहाण टाकत आहे.मुस्लिम ही देशाची समस्या नाही महागाई आणि बेरोजगारी ही देशाची समस्या आहे,मोदी सरकारने सर्व सामान्य जनतेला महागाईच्या खाईत ढकलून दिले आहे.बीड जिल्ह्यात प्रचारासाठी मुंबई दिल्ली येथून हेलिकॉप्टर, विमानाने कितीही नेते येऊ द्या काही फरक पडणार नाही.परंतु ४ जूनला बजरंग सोनवणे यांना विजयी करून त्यांना दिल्लीला पाठवा असे म्हणत मतासाठी देशात धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातोय. मोदी सरकार रोजगार, बेरोजगारी,महागाई,शेतकऱ्यांचे प्रश्नावर न बोलता जातीपातीचे राजकारण करत असल्याचा आरोप खासदार अमोल कोल्हे यांनी केला.ते सोमवारी (ता.६) आष्टी येथे महाविकास आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.तर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले की, बीड जिल्हा हा दुष्काळी भाग असून दुष्काळचा कलंक पुसण्यासाठी माझ्या काळात आष्टी तालुक्यातील खुंटेफळ साठवण तलाव,शिरूर तालुक्यात सिंदफणा प्रकल्पाची उंची वाढवण्यासाठी प्रयत्न केले. बीड जिल्ह्यातील जनतेला रेल्वेचे स्वप्न दाखवले ते ही पूर्ण करता आले नाही,जनता यावेळी जिल्हयात चमत्कार घडविणार आहे. सरकारने जिएसटी च्या माध्यमातून सर्व सामान्य जनतेच्या पैशांची लूट केली.शेतकऱ्यांच्या शेतमालाला निर्यात बंदी करून केंद्र सरकारने शेतकऱ्यांना नुकसानीत टाकण्याचे पाप केले असे म्हणत जयंत पाटील म्हणाले की, सत्तेत आल्यावर आम्ही आरक्षण देऊ.पंतप्रधान यांना निवडणुकीसाठी जिल्हयात यावे लागते म्हणजे जनतेने निवडणुक हातात घेतल्याने बजरंग सोनवणे यांचा विजय निश्चित आहे असे ही शेवटी जयंत पाटील म्हणाले. या कार्यक्रमाला आ.संदीप क्षीरसागर,माजी आ.सय्यद सलीम,माजी आ.साहेबराव दरेकर,माजी आ.सुनील धांडे,उषा दराडे,परमेश्वर सातपुते,महेबुब शेख,सुशीलाताई मोराळे, अजिंक्य भैय्या चांदणे,दिपक केदार,कॉम्रेड महादेव नागरगोजे,जीवन गोरे,विष्णुपंत घोलप,हनुमंत भिसे,आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक राम खाडे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब मिसाळ व डॉक्टर नदीम शेख यांनी तर आभार गणीभाई तांबोळी यांनी मानले.या कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व खासदार अमोल कोल्हे यांच्या उपस्थितीत असंख्य कार्यकर्त्यांनी जाहीर प्रवेश केला.रखरखत्या उन्हात कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती.

# दानापुर येथे ८५ वयापेक्षा जास्त आणि अपंग व्यक्तीचे घरी जाऊन मतदान संपन्न



लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । शेख जफर**

लोकसभा निवडणुकीच्या अनुशंगाने दानापुर येथे ८५ वयापेक्षा जास्त आणि अपंग व्यक्तींचे आज दिनांक ७ मे २०२४ रोजी प्रत्यक्ष घरी जाऊन मतदान करून घेण्यात आले. त्यामध्ये नाजीराबी जिलानी शेख, भागीरथीबाई दगडूबा आढाव, रशीद गफार शेख इत्यादींचे प्रत्यक्ष त्यांच्या घरी जाऊन मतदान करून घेण्यात आले. हे मतदान मतदान केंद्राध्यक्ष बी एल दळवी, सहाय्यक मतदान अधिकारी महेंद्र साबळे, निरीक्षक श्री प्रशांत कांबळे , एल व्ही चौधरी पोलीस कर्मचारी,व्हिडिओ ग्राफर भगवंत जांभोळ, बीएलओ, टी एस लोखंडे, के डी दांडगे वरील टीमने मतदान प्रक्रिया पार पाडली. व मतदान हे इन कॅमेरा झाले.

# डीजे बेंड संघटना कडून न्याय न मिळाल्यास निवडणुकीवर टाकणार बहिष्कार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार । गोठी मलकापूर**



मलकापूर आज दिनांक ७मे रोजी मलकापूर, नादुरा येथील डिजे सघटणाने मलकापूर येथील पोलिस स्टेशन ला दिलेल्या निवेदनात नमूद आम्ही व्यवसायाने डिजे जॉकी (गाणे वाजविणे) करणारे असून सदर डिजे जॉकी साठी लागणारे सांऊड काहींनी शेतीवर, घरावर कर्ज काढुन घेतलेले आहे. तर काहींनी बँकेचे कर्ज काढुन घेतलेले आहे. तर काहींनी सदर साऊंड हा व्याजाने पैसे घेवून विकत घेतलेले आहे.साऊंड विकत घेतलेले असल्यामुळे आमच्यावर भरपूर कर्ज झालेले आहे. व त्याचे हप्ते भरणे बाकी आहे. सदर आमच्या व्यवसायावर प्रत्येक डिस्क जॉकीवर प्रत्येक पाच ते सहा माणसे व त्यांच्या फॅमीली मेंबर व परिवार अवलंबून आहे. परंतू मलकापूर व नांदुरा तालुक्यामध्ये पोलीस स्टेशन हे सदर डिस्क जॉकी वाजविण्यासाठी कोणतेही कारण नसतांना मनाई केली आहे. व सदर डिस्क जॉकी वाजविण्यासाठी कायदेशिर परवानगी सुध्दा देत नाही. त्यामुळे आमच्या व्यावसायावर अवलंबुन असलेले आमचे संपुर्ण कुटूंब यावर आमच्या व्यवसाय हा बंद केल्यामुळे उपासमारीची वेळ आलेली आहे. आम्ही व्यवसायासाठी घेतलेले कर्ज व त्याचे हप्ते फेडण्यासाठी पैसे नसल्यामुळे आमच्यावर कर्जाच्या हप्ते चे बोजे वाढत आहे. त्यामुळे आमच्या व कुटूंबावर आर्थिक ताण येवून आमचे व आमच्या कुटुंबाचे जगणे कठीन झाले आहे. यातुन आपल्या जिल्हयात व बाहेरील जिल्हयामध्ये सुध्दा व्यवसाय चालु करण्याबाबत परवानगी दयावी. अन्यथा आम्ही व आमच्या व्यवसायावर अवलंबुन असलेले सर्व कामगार त्यांची कुटूंबे हे या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीवर बहीष्कार टाकु करीता हे निवेदन देत आहे. अन्यथा आम्ही आमच्या परीवारासह लोकशाही मागनि उपोषणाला बसु. तसेच बुलढाणा पोलिस अधीक्षक यांनी सहा लाखाच्या जवळपास दंड स्वरूपात शिक्षा ठोठावली आहे ते पैसे भरण्याची आमची परिस्थिती नाही त्यामुळे तो दंड आम्ही बरण्यास असमर्थ आहे म्हणून शासकीय नियमा अती शर्ती नुसार आम्ही आमचा व्यवसाय करू आम्हाला व्यवसाय करण्याची परवानगी द्यावी अशी माहिती आहे.

## मलकापूर शहरामध्ये लोकसभा निवडणूक येत्या १३ तारखेला असल्यामुळे

# लोकप्रतिनिधी व लोकसभा निवडणुकीत उभे असलेले उमेदवारांना लोकांची तृष्णेचा पडला आहे विसर



लोकनेता न्यूज नेटवर्क


**अनिलकुमार । गोठी मलकापूर**

मलकापूर शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे त्यामुळे मलकापूर शहरातील समाजसेवक आशिष माहुरकर श्रीराम प्रतिष्ठान यांनी मलकापूर शहरातील काही भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची तृष्णा भागवण्यासाठी टँकर द्वारे पाणी वितरित केले आहे त्यावेळी जनतेचा रोष लोकप्रतिनिधीच्या विरोधात पाहायला मिळाला लोकांनी पिण्याची पाणी सुद्धा आमदार देऊ शकत नाही मोठ-मोठे भूमिपूजन करण्यासाठी आमदाराकडे वेळ आहे तर नागरिकांच्या मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी आमदार लक्ष देत नाही तेव्हा भर उन्हाळ्यामध्ये लोकांना पिण्याचे पाणी सुद्धा देऊ शकत नाही म्हणून येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये कोणाला मतदान करावे व कोणाला मतदान करू नये हे स्पठ झाले आहे अशा प्रकारचा रोष व्यक्त करीत आशिष माहुरकर यांचे धन्यवाद करीत जनतेने राजकीय पुढार्यांच्या गोड बोल्या व ढोपर सोल्या गोष्टी वर विश्वास ठेवला तर यापेक्षाही कठीण परिस्थिती येऊ शकते म्हणून यानंतर विचारपूर्वकच आम्ही मतदान करू अशी प्रतिपादन जनतेने केले .

मलकापूर शहरांमध्ये १४ ते १५ दिवस झाल्यानंतरही पाणीपुरवठा विभाग जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी वणवण पायपीट करायला भाग पाडत आहे त्यामुळे या वेळी नगरपालिकेला निवेदन दिल्यापेक्षा या लोकांना मूलभूत सुविधा देण्याचा प्रयत्न आमची संघटना करत असते तर यावेळी पंधरा दिवस झाल्यानंतर पिण्याच्या पाण्याची सोय राजकीय नेते मंडळी व लोकप्रतिनिधी करून देऊ शकत नाही म्हणून बऱ्याच भागामध्ये टँकरने नागरिकांना पिण्याचे पाणी घेणे गरजेचे समजून ती गरज पूर्ण करणे गरजेचे होते म्हणून मलकापूर शहरातील अनेक वार्डात टँकरद्वारे पाणी वितरित करीत आहे.

**समाज सेवक,आशिष महुरकर**

# क्रीडा मंत्री ना.संजय बनसोडे यांनी आपल्या पत्नीसह रांगेत थांबून बजावला मतदानाचा हक्क



लोकनेता न्यूज नेटवर्क

**सुनिल बस्वराज हावा । उदगीर**

लातूर लोकसभेचे मतदान दि.०७ मे रोजी पार पडले. यावेळी उदगीर व जळकोट मतदार संघाचे आमदार तथा राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी त्यांच्या पत्नी सौ.शिल्पाताई बनसोडे यांनी मलकापूर ता.उदगीर येथील जिल्हा परिषद शाळेत सर्वसामान्य नागरीकांसोबत रांगेत थांबुन मतदान केले.
यावेळी माजी सभापती सिद्धेश्वर पाटील, मलकापुरचे सरपंच गुरुनाथ बिरादार, उपसरपंच महेबुब शेख, विधानसभा अध्यक्ष प्रवीण भोळे, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, मुकेश भालेराव, आदी उपस्थित होते.

## चारोळी

ओठांनी कधीतरी गाणं गुणगुणावं
निसर्गाच्या खुशीत मस्त हरवून जावं
झुळझुळ झऱ्याचं पाणी ओंजळभर प्यावं
रिमझिम पावसात नखशिकांत भिजावं.

रंजना सानप
मायणी (सातारा)

**लोहा-कंधार मतदार संघाचे आ. श्यामसुंदर शिंदे व त्यांच्या पत्नी सौ.आशाताई शिंदे व लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रांत दादा शिंदे यांच्या सौभाग्यवती सौ.अनुजाताई विक्रांत शिंदे यांनी लातुर लोकसभा मतदार संघातील कंधार तालुक्यातील हाळदा येथील मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला..(छाया लोकनेता न्यूज नेटवर्क लोहा)**



**भारतीय जनता पार्टी महायुतीचे अधिकृत उमेदवार रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रचारादरम्यान आमदार संतोष पाटील दानवे,कळम, मा. उपसरपंच रावसाहेब आबा पवार, महिला मंडळ व पुरुष मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.(छाया लोकनेता न्यूज नेटवर्क)**



# बोध कथा

## डाव-पेच

**कथा**

एका गावात एक दिवस कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी दुरून मोठे पैलवान आले होते. त्या पैलवानांमध्ये एक असा पैलवान होता ज्याला हरवणे प्रत्येकाला शक्य नव्हते. सुप्रसिद्ध पैलवानही त्याच्या विरुद्ध फार काळ टिकू शकले नाहीत.स्पर्धा सुरू होण्यापूर्वी मुखियाजी आले आणि म्हणाले, बंधूंनो, आम्ही या वर्षीच्या विजेत्याला ३ लाख रुपयांचे बक्षीस देऊ. ,बक्षिसाची रक्कम मोठी होती, पैलवान आणखीनच उत्साहित झाले आणि स्पर्धेसाठी सज्ज झाले. कुस्ती स्पर्धा सुरु झाल्या आणि तोच पैलवान एक एक करून सर्वांना हरवत राहिला.बलाढ्य पैलवानही त्याच्यासमोर उभे राहू शकले नाहीत तेव्हा त्याचा आत्मविश्वास आणखीनच वाढला आणि त्याने उपस्थित प्रेक्षकांना आव्हानही दिले - आहे का आईचा लाल कोणी जो माझ्यासमोर उभे राहण्याचे धाडस करेल!! ,तिथे उभा असलेला एक बारीक माणूस कुस्ती बघत होता. पैलवानाचे आव्हान ऐकून त्याने मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला आणि कुस्तीपटू समोर उभा राहिला.हे पाहून पैलवान त्याच्याकडे बघून हसायला लागला आणि त्याच्याजवळ जाऊन म्हणाला, तू माझ्याशी लढशील का? आपण आपल्या होशमध्ये आहात ना?तेव्हा त्या कृश माणसाने चतुराईने वागला आणि पैलवानाच्या कानात कुजबुजले, अरे पैलवान, मी तुझ्यासमोर कसा उभा राहू शकेन? जर तू हा कुस्तीचा सामना हरलास तर मी तुला बक्षिसाची सर्व रक्कम नक्कीच देईन आणि ३ लाख रुपये तुलाही देईन. तूम्ही उद्या माझ्या घरी येऊन घेऊन जाणे,तू किती महान आहेस हे सगळ्यांनाच माहीत आहे, एकदा हारल्याने तुझी कीर्ती कमी होणार नाही...कुस्ती सुरू होते, पैलवान काही काळ लढण्याचे नाटक करतो आणि नंतर हरतो. हे पाहून सर्वजण त्याची खिल्ली उडवू लागतात आणि त्याला घोर निंदेतून जावे लागते.दुस-या दिवशी पैलवान शर्थीचे सट्टेचे पैसे घेण्यासाठी कर्श माणसाच्या घरी जातो आणि ६ लाख रुपये मागतो.

तेव्हा तो कृश माणूस म्हणतो, भाऊ, पैसे कशाचे? ,अरे, तू मला मैदानावर वचन दिलेस तेच. , पैलवान आश्चर्यचकित होऊन म्हणतो.तो दुबळा माणूस हसत म्हणाला, असेच मैदानाची कथा होती, जिथे तू तुझ्या चाली करत होतास आणि मी माझ्या चाली करत होतो पण यावेळी माझ्या चाली तुझ्यापेक्षा जास्त भारी ठरल्या झाल्या आणि मी जिंकलो. ,

**बोध**

*मित्रांनो, ही कथा आपल्याला शिकवते की थोड्या पैशाच्या लोभामुळे वर्षानुवर्षे कष्ट करून मिळालेली प्रतिष्ठा काही क्षणात नष्ट होते आणि पैसाही गमवावा लागतो. त्यामुळे आपण आपल्या नैतिक मूल्यांशी कधीही तडजोड करू नये आणि कोणत्याही प्रकारच्या भ्रष्टाचारापासून दूर राहीले पाहिजे.



दि .७ मे २०२४ ला असलेल्या दैनिक लोकनेताचे आदर्श संपादक मा.श्री ज्ञानेश्वर बुधवत यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा ।। त्यांच्या वाढदिवसा निमित्त मी त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वावरील लोकनेता मा . श्री ज्ञानेश्वर बुधवत ही माझी अभंगरचना त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाला अर्पण करतो .

**अभंग**
**लोकनेता**
**मा.श्री ज्ञानेश्वर बुधवत**

ज्ञानेशांना देतो। हार्दिक शुभेच्छा ।।
मनस्वी सदिच्छा । जन्मदिनी ।। १ ।।

आदर्श असे हे । संपादक एक ।
ज्ञानेश्वर एक । बुधवत ।। २ ।।

लोकनेता आज । प्रसिद्ध पावला ।
न्हाऊन निघाला । महाराष्ट्र ।। ३ ।।

शब्दांचे ते बाण । बातमीत दिसे ।
निर्भिडता असे। लेखनीत ।। ४ ।।

सिंदखेडराजा । युवा पत्रकार ।
लेखनीची धार । धारदार ।। ५ ।।

संयमी माणूस । स्वभावही शांत ।
ज्ञानी बुधवत । संपादक ।। ६ ।।

गरजूंना देई । मदतीचा हात ।
पेटविती वात। झोपडीत ।। ७ ।।

संपादक एक । ज्ञानेश्वरपंत ।
भाऊ बुधवत । लोकनेता ।। ८ ।।

सत्याचे कैवारी । लेकनेता एक ।
आदर्श दैनिक । ज्ञानेशांचे ।। ९ ।।

जन्मदिनी आज । करितो सलाम ।
करांनी प्रणाम । ज्ञानेशांना ।। १० ।।



**समाजभूषण पुरस्कार प्राप्त अभंगकार**
**प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले**
**रुक्मिणी नगर,अमरावती.**
**भ्रमणध्वनी : ८०८७७४८६०९**

# बदलत्या हवामानाचा परिणाम;राज्यात फक्त २८ टक्के जलसाठा;पाणीटंचाईचे संकट भिषण

उन्हाचे चटके चोहोबाजूंनी जाणवू लागले असतानाच राज्यात लघु,मध्यम व मोठ्या प्रकल्पात एप्रिलमध्ये ३८ टक्के जलसाठा होता आणि आता आणखी कमी होऊन केवळ २८ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक रहाला आहे.यामुळे पाणी टंचाईच्या झळा सर्वत्रच जाणवू लागल्याने राज्यातील २ हजार ३४४ गावात आणि ५ हजार ६०५ वाड्यांवर टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे.यामुळे यावर्षी पाणीप्रश्न अत्यंत गंभीर होण्याचा धोका व्यक्त होत आहे.येत्या काळात उन्हाचा पारा वाढल्याने पाण्याची भिषण टंचाई निर्माण होवू शकते याला नाकारता येत नाही.राज्यात मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी टँकरची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे.सध्याच्या परीस्थितीत राज्यातील धरणांची स्थिती अत्यंत गंभीर आहे अमरावती ४३.८४ टक्के,कोकण ४२.१२टक्के, नागपूर ४०.४३टक्के,नाशिक ३०.६५ टक्के, पुणे २३.६९ टक्के, मराठवाडा १३.४० टक्के, संभाजीनगर ११.८९ टक्के यावरून स्पष्ट होते की पाण्याच्या बाबतीत संभाजीनगर ,मराठवाडा व पुणे अत्यंत चिंताजनक स्थितीत असल्याने तीव्रपाणी टंचाई दिसून येते.कारण राज्यातील २ हजार ९९४ प्रकल्पांची एकुण क्षमता ४० हजार ४८५ दशलक्ष घनमीटर आहे.सध्या या प्रकल्पामध्ये फक्त १५ हजार १८९ दशलक्ष घनमीटर पाणी साठा उरला आहे. म्हणजेच दिवसेंदिवस पाण्याची समस्या आणखीनच बिकट होण्याची शक्यता दिसत आहे.सध्या राज्यातील १८ ते २० धरणे कोरडी पडली आहेत.त्यामुळे येत्या काळात राज्याला तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार असल्याचे चिन्ह जवळपास निश्चित आहे.यावर्षी बदलत्या हवामानामुळे नेहमीपेक्षा कमी पाऊस झाल्याने उष्णतेच्या लाटे सोबतच पाण्याच्याही हाहाःकाराला आतापासूनच सुरूवात झाली आहे.दरवर्षी पावसाची कृपादृष्टी असणारा पश्चिम महाराष्ट्र यंदा पाण्यासाठी तडफतो आहे. त्यामुळे आतापासूनच टँकरग्रस्त झाला आहे.पुणे विभागातील कोल्हापूर जिल्हा वगळता पुणे, सातारा, सांगली, आणि सोलापूर या चार जिल्ह्यांतील विहिरींनी तळ गाठला आहे. यामुळे ३३४ गावातील ६ लाख ७२ हजार ८०७ नागरिकांना ३६४ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे.यावरून स्पष्ट होते की संपूर्ण महाराष्ट्रात पाण्याची टंचाई भेडसावणार आहे. याचे प्रायचित्य मानव, पशुपक्षी, संपूर्ण जीवजंतू,जंगल संपदा यांना आतापासूनच भोगावे लागत आहे.अजुन पावसाळ्याला दोन महिने बाकी आहे.राज्यासह



देशातील जलाशय साठा निम्म्यावर आलेला आहे तर दुसरीकडे सुर्य आग ओकत आहे म्हणजेच पाण्याची समस्या आणि सुर्याचे आक्राळविक्राळ रूप आणि जलसाठा कमी होने यामध्ये पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवसृष्टीला यावर्षी अत्यंत कठीणायीचा सामना करावा लागण्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे. महाराष्ट्रासह देशातील बदलत्या हवामानामुळे सर्वत्र उष्णतेची लाट तर कधी अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे संपूर्ण जीवसृष्टी मानव, पशुपक्षी यांचे जीवन विस्कळीत होतांना दिसते तर दुसरीकडे वाढत्या तापमानामुळे पाण्याची समस्या दिवसेंदिवस अत्यंत बिकट होतांना दिसत आहे.विदर्भात नागपूर, यवतमाळ, अकोला, चंद्रपूर येथे उष्णतेची लाट कायम आहे तर मुंबईसह रायगड, ठाणे, पालघर येथे उकाडा वाढला आहे.म्हणजेच सुर्याने आपले उग्र रूप कळत न कळत सर्वत्र पसरविले आहे.त्यामुळे हवामान खात्याने महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना उष्णतेच्या बाबतीत एलो अलर्ट घोषित केले आहे.अकोला ४४.३० अंश सेल्सिअस,सोलापुरचे तापमान ४३.१ अंश सेल्सिअस, चंद्रपूर ४०.८ अंश सेल्सिअस, वाशिम ४३ अंश सेल्सिअस, यवतमाळ ४२.२ अंश सेल्सिअस, नागपूर ४१.५ विदर्भातील सरासरी तापमान ४२ अंश सेल्सिअस, मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील तापमान ४० अंश सेल्सिअसची नोंद झाली.यावरून स्पष्ट होते की दिवसा तर उकाडा वाढलाच परंतु रात्रीही उकाड्याचे चटके संपूर्ण महाराष्ट्राला सहन करावे लागत आहे.हवामान खात्याने असेही वर्तविले आहे की मे ते जून महिन्यात देशातील अनेक भागातील उन्हाची झळ अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येणारे दोन महिने सर्वांनीच आपापली काळजी घेणे गरजेचे आहे.राज्यातच नाही तर देशातील अनेक भागात सुर्य आग ओकतांना दिसतो आणि हा संपूर्ण प्रकार दिवसेंदिवस बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेला आहे.गंगेच्या खोऱ्यातील पश्चिम बंगाल,पूर्व झारखंड, उत्तर ओडिशा आणि रायलसीमा येथे कमाल तापमान ४४ ते ४७ अंश सेल्सिअसच्या आसपास रहाण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविला आहे.यावर्षी वेळेच्या आधीच सुर्याने आक्राळ - विक्राळ रूप धारण केल्याचे दिसून येते आणि पुढे आणखी भयानक स्थिती निर्माण होवू शकते याला नाकारता येत नाही.कारण आतापासुनच नदी, तलाव, विहिरी, धरणे यांच्या पाण्याची पातळी कमी कमी होत आहे आणि ही परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्रातच नाही तर देशासह संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळेल.आतापासुनच महाराष्ट्रात तापमानाचा पारा सिमापार करून पुढील काही दिवसांत कठीण परिस्थितीत निर्माण करण्याची भीती वर्तवली जात आहे.कारण मानवाने केलेला निसर्गाचा ह्यास यामुळेच आज आपल्याला उन्हाचे चटके व पाणी टंचाईचा सामना करावा लागतो आहे. त्याचप्रमाणे मानवाने केलेल्या पापाचे प्रायश्चित्त मानव तर भोगतच आहे सोबतच पशुपक्षी, संपूर्ण जीवसृष्टी, पृथ्वी, आकाश-पाताळ,नदी-नाले,तलाव, धरणे, विहिरी यांनाही भोगावे लागत आहे.कारण राज्यासह देशातील वाढते तापमान हे दिवसेंदिवस निसर्गावर सरळ प्रहार करीत असुन संपूर्ण निसर्गाचे संतुलन ढासळत आहे त्यामुळे ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे.त्यामुळे नागरिकांनी वाढत्या तापमानापासुन स्वतःला सांभाळणे गरजेचे आहे.बदलत्या हवामानामुळे यावर्षी पाऊस कमी झाला. त्यामुळे आतापासूनच राज्यातील अनेक भागात आपल्याला भिषण पाणी टंचाई दिसून येत आहे.जलाशयामध्ये फक्त २८ टक्के जलसाठा उपलब्ध असल्याचे सांगितले जाते.म्हणजे एकीकडे तापमानात वाढ यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम,तर दुसरीकडे पाणी टंचाई अशा डबल गंभीर समस्यांशी आपणा सर्वांना झुंज द्यावी लागणार आहे.वाढत्या तापमानामुळे उष्णतेची व अवकाळी पावसाचे बादल महाराष्ट्रासह अनेक राज्यात दिसून येते.राज्यात वाढते तापमान पहाता आरोग्य विभागाने उष्माघातापासून बचाव करण्याचे आवाहन सुध्दा केले आहे.वाढत्या उष्णतामानामुळे उन्हात फिरल्याने डोके दुखी,ताप येणे, जास्त घाम येणे, चक्कर येणे, बेशुद्ध पडने अशा पध्दतीची साधारणतः उष्माघाताची लक्षणे जानवु शकतात.यावर प्रार्थमिक उपाय म्हणून स्वतःची काळजी घेणे गरजेचे आहे.सावलीचा सहारा घेणे, थंड पेय घेणे,नारळाचे पाणी पिने, पाणी भरपूर पिने साधारणतः बाहेर निघताना कॉटनचे सैल कपडे घालावेत आणि जास्तच अस्वस्थ वाटत असेल डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.परंतु आज वाढत्या तापमानामुळे पशुपक्ष्यांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे त्यामुळे त्यांच्यासाठी आपापल्या पद्धतीने पाण्याची व्यवस्था केली पाहिजे व पशुपक्षांना वाढत्या तापमानापासुन दिलासा दिला पाहिजे.बदलते हवामान, पाणी साठा कमी होने,अती उष्णता, अवकाळी पाऊस याला रोखण्यासाठी राज्यासह देशात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.यामुळे वातावरणात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येईल व निसर्ग प्रफुल्लित राहील.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**

# लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज !

आज ६ मे, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १०२ वि पुण्यतिथी. आजच्याच दिवशी १९२२ रोजी त्यांचे निधन झाले. २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर ( करवीर ) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नामकरण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्यभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतूम बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली. शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे



असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. शाहू महाराजांच्या या निर्णयाला तेंव्हा खूप विरोध झाला पण विरोधाला न जुमानता त्यांनी या आरक्षणाची कठोर अंमलबजावणी केली. शाळा, दवाखाने, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी समतेने वागावे, त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला. १९१७ साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवादासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देणे असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले. त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला. नगदी पिके आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूटची स्थापना केली. चित्रकला, लोककला, संगीत, साहित्य, नाट्य, कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना त्यांनी राजाश्रय मिळवून दिला. शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहे. बाबासाहेब मॅट्रिकमध्ये असताना आणि नंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना त्यांनी बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली. २० आणि २१ मार्च १९२० रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करून कोल्हापूरच्या राजवाड्यात त्यांना जेवणाचे निमंत्रण दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे साप्ताहिक सुरू केले पण आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद करावे लागले जेंव्हा हे शाहू महाराजांना समजले तेंव्हा त्यांनी २५०० रुपयांची आर्थिक मदत देऊन हे साप्ताहिक पुन्हा सुरू केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांची इतिहासात नोंद आहे. व्यापक दूरदृष्टीच्या या राजाने त्याकाळी राजेशाही असूनही सामाजिक बंधुभाव, दलित व उपेक्षितांचा उद्धार, शिक्षण, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य या क्षेत्रांमध्ये जे कार्य केले आहे तसे कार्य आजवर कोणीही केले नाही. त्यांचे कार्य आजच्या आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे. आज त्यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो ही एकप्रकारे त्यांच्या कार्याला दिलेली मानवंदनाच आहे. पुण्यतिथीदिनी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# जिल्हा दुष्काळमुक्त करण्यासाठी स्व. बाळासाहेब विखे यांनी सातत्याने प्रयत्न केला-ना.राधाकृष्ण विखे

**अहमदनगर । प्रतिनिधी**

जिल्ह्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी स्व. बाळासाहेब विखे पाटील यांनी सातत्याने संघर्ष केला. महाराष्ट्र पाणी परिषेदेच्या माध्यमातून त्यांनी पाणी प्रश्नाबाबत केलेल्या सुचनांचे शासनाकडून धोरणात रुपांतर होणे, हेच त्यांच्या प्रयत्नांचे यश ठरले असे प्रतिपादन महसूल, पशुसंवर्धन मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

शेती, सहकार, शिक्षण, पाणी आणि ग्रामीण विकासाचे प्रनेते लोकनेते पद्मभुषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या यांच्या ९२ व्या जयंती दिनाचे ओचित्य साधुन प्रवरा परिवाच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी खा. डॉ, सुजय विखे पाटील,जेष्ठ नेते वंसतराव कापरे, भाजपा नेते विनायकराव देशमुख, यांच्यासह विविध संस्थाने पदाधिकारी या प्रसंगी उपस्थित होते. मंत्री विखे पाटील म्हणाले की, बाळासाहेब विखे पाटील यांनी ग्रामीण विकासाचे धोरण ठेवण्यासाठी प्रत्येक



सरकारमध्ये अभ्यास मंडळाच्या माध्यमातून सुचना केल्या. पाणी प्रश्नासाठी ते नेहमीच संवेदनशील राहीले. जिल्ह्याच्या हक्काच्या पाण्यासाठी संघर्ष करताना नवीन पाणी योजना निर्माण करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्र पाणी परिषेदेच्या माध्यमातून तयार केलेले प्रयत्न शासनाने स्विकारले. पश्चिम वाहीनी नद्यांचे पाणी तुटीच्या खोऱ्यात वळवून जिल्हा दुष्काळमुक्त करण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांना यश येत असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले. शैक्षणिक क्षेत्रात कौशल्य शिक्षणाला प्राधान्य हवे हा विचार त्यांनी प्रथम मांडला. काळाच्या ओघात आज कौशल्य शिक्षणाला आलेले महत्व पाहता बाळासाहेब विखे पाटील यांचा विचार किती दुरदृष्टाचा होता हे दिसून येते. आज जिल्ह्यात औद्योगिक वातावरण निर्माण करताना उद्योग क्षेत्राला आवश्यक मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी नगर येथे कौशल्य प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून जिल्ह्यातील युवकांना निश्चित लाभ होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# सर्वसामान्य मतदारांचे मुंडे आणि धस कुटुंबावरील प्रेम लोकसभा निवडणुकीच्या मतदानातून दिसून येईल-आ.धस

## घरोघरी जाऊन पंकजाताईंना मताधिक्य देण्याचा कार्यकर्त्यांचा एकमुखी निर्धार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडेसाहेब,त्यांच्या सुकन्या पंकजाताई मुंडे आणि सुरेश धस यांच्यावर प्रेम करणारी असंख्य जनता आष्टी विधानसभा मतदारसंघात असून अनेक निवडणुकांमध्ये त्याचा प्रत्यय आलेला आहे केवळ राजकीय विचार न करता सतत जनतेमध्ये मिळून मिसळून सुखदुःखात सहभागी होणे या विशेष बाबींमुळे या मतदारसंघात या दोन आडनावांची मोठ्या प्रमाणावर ताकद आहे आणि वेळोवेळी ही ताकद या मतदारसंघात दिसली आहे.त्यामुळे लोकसभा निवडणुकीच्या मतदानात देखील या दोन्ही आडनावांची ताकद दिसून येणार आहे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले आहे आष्टी येथील प्रमुख कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते ते म्हणाले.

यावेळी व्यासपीठावर माजी जि. प.अध्यक्ष अबुशेठ सय्यद,शिरूर कासार नगराध्यक्ष रोहिदास गाडेकर,नगराध्यक्ष राजू जाधव,मधुकर गर्जे,गोपाळ भाऊ रक्ताटे,सभापती किरण शिंदे,अरुण भैय्या निकाळजे,सादिक कुरेशी,कल्याण पोकळे, रमेश ढगे,दतोबा वाडेकर उपस्थित होते.यावेळी पुढे बोलताना आ.धस म्हणाले,या लोकसभा निवडणुकीमध्ये मराठा आरक्षणाबाबत काही अपप्रवृत्ती समाजामध्ये राजकीय दृष्टिकोनातून फायदा घेण्यासाठी गैरसमज पसरवत आहे आता हा गैरसमज अकारण असून यातील वस्तुनिष्ठता सर्वांचे लक्षात आलेली आहे प्रत्यक्षात गावोगावी प्रत्यक्ष जनतेत जाऊन याबाबतची पाहणी करत असताना चर्चा करत परिस्थिती वेगळी असलेली दिसून येत आहे.. ज्या गावातील बहुसंख्या जनता हे आपणाला मानणारी आपल्या नेतृत्वावर विश्वास ठेवणारी आहे त्या ठिकाणी प्रत्यक्ष गावोगावी वाड्यात वस्त्यांवर आपण परिस्थितीची पाहणी केली आहे भारतीय जनता पार्टी आणि मराठा आरक्षणाबाबत मतदाराच्या आणि सर्व सामान्य कार्यकर्त्याच्या कोणाच्याही काही डोक्यामध्ये नाही मात्र नाहक विरोधकांकडून जे अफवांचे पीक पसरवलं जातंय ते साफ चुकीचं आहे.ही लोकसभेची निवडणूक ज्या पद्धतीची चाललेली आहे ते पाहता आपल्या राजकीय कारकिर्दीतील ही पाहिलीच निवडणूक माझी नाहीये यापूर्वी मी १९९७ पासून राजकारण करत आलोय अनेक निवडणुका लढवल्या आहेत.प्रत्येक वेळेस काही ना काही या जिल्ह्याच्या राजकारणात घडत जातं आणि त्याचा नको तेवढं विषय वाढवला जातो.म्हणून गावागावांतील प्रमुख कार्यकर्त्यांनी आता आपले गाव मतदान होईपर्यंत सोडायचे नाही शिवाय मतदारांच्या घरोघरी जा जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने गेल्या दहा वर्षातील केलेल्या उल्लेखनीय कार्याचा त्यांनी राबवलेल्या विविध योजनांची माहिती पुस्तिका त्यांच्या हातात द्या.आणि पंकजा ताईंना मतदान करण्याचे आवाहन मतदारांना करा असे सांगत प्रमुख कार्यकर्त्यांना पदाधिकाऱ्यांना उद्देशून ते म्हणाले की,आज आम्ही जात्यात आहोत पण तुम्ही सुद्धा सुपात आहात.तुम्हालाही जात्यात यावं लागेल असे जर



झाले.तर तुम्ही समजून घ्या एकदा भोंगळे सहकारी संस्था पार्टी जर झाली तर हे कायमस्वरूपी भोंगळे सहकारी संस्था होऊन जाईल असे होऊ द्यायचे नसेल तर प्रामाणिक पणे कामाला लागा. कोविड सारख्या भयंकर साथीच्या रोगांमध्ये जनता भयभीत झालेली असताना आपण रस्त्यावर उतरून २४ तास जनतेच्या सेवेत राहिलो आहे.विविध कारखान्यांवरून परत येत असताना अनेक गावांमध्ये ऊसतोड मजुरांना अडविल्या नंतर त्यांना सोडविण्यासाठी देखील आपण रात्री अपरात्री घराबाहेर पडलो होतो.त्या वेळेस जो कोणी अडचणीत असेल त्याला अहोरात्र मदत करण्याचे काम मी केलेले आहे.त्याचा परिणाम म्हणून माझ्यावर गुन्हे दाखल झाले.तरीही मी मागे वळून न जाता इतर पुढार्यांसारखा षंढ म्हणून घरात बसलो नाही कायम जनतेची सेवाच करत राहिलो. १२ महिने १८ काळ माझं कुटुंब, माझ्या कुटुंबातील सर्व माणसे ही लोकांच्या सुखात आणि दुःखात नेहमी सहभागी आहेत याची कुठेतरी आपण जाण ठेवा.अरे तुमच्या अण्णाला सहकार्य करायला माझ्या स्वतःच्या निवडणुकीमध्ये पंकजाताई स्वतः ग्राम विकास मंत्री असताना त्या माऊलीने २५ दिवस स्वतःचं कार्यालय आणि सगळी कामं बाजूला ठेऊन फक्त सुरेश धस साठी त्या तीन जिल्ह्यामध्ये सगळीकडे फिरत होत्या. आता ह्या वेळेस आपल्याला त्यांच्यासाठी दारोदारी जायचं आहे.लोकांना सांगायचं ज्यांनी सत्तेच्या काळात समाजाला आरक्षण देण्याचे काम करणे गरजेचे होते.. महाविकास आघाडीचे विश्व प्रवक्ते संजय राऊत यांनी अतिशय शिस्तबद्ध आणि शांततेच्या वातावरणात काढलेल्या मराठा आरक्षणाच्या मूक मोर्चाला मुका मोर्चा असे संबोधले होते आणि समाजाला हिणवले होते हे कसे विसरता येईल असा सवाल करत ते म्हणाले ज्यांनी समाजाला मिळणारे आरक्षण स्वतः मुख्यमंत्री असताना समाजाला आरक्षण कसे मिळणार नाही याची तंतोतंत काळजी घेतली अशा लोकांच्या पाठीशी आपले काही लोक जात आहेत.त्यांनी थोडा अभ्यास करणे गरजेचे असल्याचे मत आ.धस यांनी व्यक्त केले.या बैठकीस विस्तारक हरिष खाडे,देविदास धस,जयदत्त धस,श्याम धस,दत्ता काकडे,अमर निंबाळकर,माऊली जरांगे,प्रकाश कवठेकर,महेंद्र गर्जे,बद्रीनाथ जगताप, सभापती रमजान तांबोळी,गणेश शिंदे,जिया बेग,संजय आजबे,भाऊसाहेब भवर,रंगनाथ धोंडे,सुरेश उगलमुगले,रामहरी महारनोर,भागवत येवले,गणेश भांडेकर,अंकुश चव्हाण,अजित घुले,चेअरमन शांतीलाल भोसले,परिवंत गायकवाड,अशोक इथापे,खंडू जाधव,अशोक गर्जे,अशोक पवार,छत्रगुण मरकड,आत्माराम फुंदे,शरद भगत,जयशिंग गव्हाणे,प्रकाश देसरडा,नवनाथ नागरगोजे,बन्सीभाऊ पोकळे,अशोक सुपेकर,राहुल सुरवसे,संजय ढोबळे,बाळासाहेब बोराडे,चिंटू शेठ अग्रवाल, यांच्यासह बूथप्रमुख,प्रवासी कार्यकर्ता,शक्ती केंद्रप्रमुख,वॉरियर्स,सुपर वॉरियर्स,विस्तारक,गणप्रमुख, गटप्रमुख,प्रमुख पदाधिकारी यांच्यासह असंख्य कार्यकर्ते या नियोजन बैठकीत उपस्थित होते.

---

### हिंगोली,सेनगाव,वलाना ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने

# स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिकेचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव महादेव । हरण**

सेनगाव तालुक्यातील वलाना ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका तयार करण्यात आली आहे एक मे महाराष्ट्र दिवस व कामगार दिवस यांचे औचित्य साधून ग्रामपंचायत माध्यमातून गावातील मुलांच्या हितासाठी उज्वल भविष्यासाठी सरपंच डॉ देवानंद गोरे उपसरपंच ग्रामसेवक नामदेव गाढवे बायफ संस्था अध्यक्ष ग्रामपंचायत सदस्य यांनी विशेष लक्ष घालून गावातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिकेचे आयोजन केले जेणेकरून या अभ्यासिकेकडुन मुलानी भरपूर अभ्यास करून गावाचे नाव रोशन करावे याच उद्देशाने सरपंच उपसरपंच ग्रामसेवक सदस्य बायफ संस्था अध्यक्ष यांनी या अभ्यासिकेचे आयोजन केले गावामधून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे,



---

# लवकरच चित्रपट सृष्टीतून बदलणार सिंदखेड राजा नगरीचा चेहरा मोहरा

## हजारो तरुण-तरुणींना मिळणार रोजगार ;अभिता फिल्म्स इंडस्ट्रीज चे सीईओ सुनील शेळके यांच्या संकल्पनेतून साकारतेय पहिली चित्रपटसृष्टी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

बुलढाणा जिल्हाच नव्हे तर अवघ्या महाराष्ट्रात सिंदखेड राजाची ओळख राष्ट्रमाता जिजाऊंचे माहेर घर म्हणून ओळख आहे. आता मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ जन्मस्थळी प्रथमच सिनेमासृष्टी उभी राहत असून. मोती तलाव जवळ निसर्गरम्य ठिकाणी निर्माते सुनील शेळके यांच्या संकल्पनेतून चित्रपटसृष्टी साकार होत असून. महिनाभरापासून असंख्य तरुणांच्या हाताला या ठिकाणी काम मिळाले असून हजारो तरुणांना रोजगार ह्या माध्यमातून उपलब्ध झाला आहे.



चित्रपटसृष्टी च्या माध्यमातून प्रथमच आपल्या मायभूमीत निर्माते सुनील शेळके यांनी मोठे धाडस दाखवून जिजाऊंच्या जन्मस्थळ असल्याचे सिंदखेडराजा चित्रपटसृष्टीसाठी निवडले आहे. या चित्रनगरीमुळे बुलढाणा जिल्ह्यातील स्थानिक कलाकारांना विविध सिनेमांमध्ये काम करण्याची संधी प्राप्त होणार असून नवीन रोजगार ही उपलब्ध होणार आहेत. सुनील शेळके यांच्या कल्पक दूरदृष्टीकोनातून हा प्रकल्प उभा राहत असून या प्रकल्पामुळे सिंदखेडराजा नगरीतील वैभवात अधीक भर पडणार आहे.राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ साहेब आमची अस्मिता असून या स्थळाचे जगभरात महत्त्व वाढवे म्हणून आमचा हा प्रामाणिक प्रयत्न असल्याचे निर्माते आणि अभीता फिल्मस चे सीईओ सुनिल शेळके त्यांनी सांगितले. भविष्यात याठिकाणी देशभरातील चित्रपटांचे चित्रीकरण केले जाईल. त्यामुळे बुलढाणा जिल्ह्याचा लौकिक नक्कीच वाढेल, असेही ते बोलतांना म्हणाले, तसेच जिल्ह्यातील तरुणांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहेत.

---

# रिक्षा चालवणारा शिंदे आमच्या समोर कोपऱ्यात बसायचा-खैरे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**

मतदानाला सात दिवस राहिले असताना सत्ताधारी विरुद्ध विरोधक असे सामने रंगू लागले आहेत. उद्धवसेनेचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांनी खुलताबाद येथील जाहीर सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची 'रिक्षावाला' म्हणून खिल्ली उडवली, तर शिंदेसेनेचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी खैरेंना निवडणुकीत याची किंमत चुकवावी लागेल, अशी प्रतिक्रिया दिली.रिक्षा चालवणारा हा शिंदे आमच्यानंतर शिवसेनेत आला. कोपऱ्यात बसायचा. दिघे साहेब गेल्यावर नमस्कार करत, झुकत साहेबांच्या पुढे पुढे करू लागला.उद्धवसाहेब मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी आपल्याकडे काही ठेवले नाही. समृद्धी महामार्गाचे खाते शिंदेंना दिले. त्यांनी स्वत:चीच समृद्धी साधली. सामान्यांसाठी एफएसआय वाढवून दिला. याने त्यातून लुबाडले आणि लुटलेल्या त्या पैशातून पक्ष फोडला.भाजपने मराठवाड्यासाठी काहीही केले नाही. कन्नड घाटाच्या भुयारी मार्गासाठी मी एक लाख सह्या गोळा केल्या. गडकरी सोडून भाजपच्या एकाही मंत्र्याने मदत केली नाही आणि आता मराठवाड्यात घुसत आहेत, प्रचारासाठी येत आहेत. उद्धव साहेबांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्याला मदत केली.शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रात अशाच सामान्य माणसांना मोठे केले. एका शिवसैनिकाबद्दल असे बोलणे याची खैरेंना याच निवडणुकीत किंमत चुकवावी लागेल.पैसे कुठे गेले ते खैरेंना माहीत नाही, पण उद्धव ठाकरेंना नक्कीच माहीत आहे. खैरेंनी मातोश्रीवर जाऊन हा प्रश्न विचारावा. त्या वेळी त्यांना कळेल नेमकी कुणाची समृद्धी झाली.खैरे काँग्रेसची भाषा बोलू लागले आहेत. कुणी कुणाला मदत केली हे जनता जाणते. भाजपने काय केले आणि मोदींनी काय केले हे यांनी सांगण्याची गरज नाही. लोकांना माहीत आहे, कोरोनाकाळात कोण घरात बसलं होतं आणि कोण लोकांसाठी झटत होतं. मुख्यमंत्र्यांबद्दल असे बोलणे खैरेंना शोभत नाही.

---

# मतदान करून सुप्रिया सुळे थेट अजितदादांच्या घरी:बारामतीमध्ये मोठा राजकीय ट्विस्ट

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बारामती (वृत्तसंस्था)**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याचे मतदान आज होत असतानाच बारामतीमधून एक मोठी बातमी समोर आली आहे. शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे या थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भेटीला पोहोचल्या आहेत. अजित पवार आणि त्यांच्या आई काटेवाडीत आहेत, त्यांच्या भेटीसाठी सुप्रिया सुळे एकट्याच गेल्या आहेत. काकी आशाताई यांच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी मी आले होते असे सुप्रिया सुळे यांनी म्हंटले आहे. मात्र या भेटीमुळे बारामतीच्या राजकारणात मोठा ट्विस्ट पाहायला मिळण्याची शक्यता आहे.भेटीनंतर सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या, ''मी आशा काकी यांना नमस्कार करण्यासाठी आले होते. घरात फक्त मी आणि काकीच होते. मी फक्त काकींची भेट घेतली. तुम्ही अजित पवार यांच्या घरी अचानक आल्या? असा प्रश्न सुप्रिया सुळे यांचा विचारला. त्यावेळी त्यांनी हे माझ्या काका, काकींचे घर आहे. माझ्या आयुष्यातील लहाणपण याच घरात राहत गेले आहे. मी या घरात दोन- दोन महिने राहिले आहे. त्यावेळी माझ्या आईशी बोलणे होत नव्हते. जेवढे माझ्या आईंनी माझे केले नाही, तेवढे माझ्या सर्व काकींनी माझ्यासाठी केले'' अशी भावना सुप्रिया सुळेंनी व्यक्त केली आहे.

---

# तरूणांचा निर्धार;महाविकास आघाडीच्या बजरंग सोनवणे यांना निवडून आणणार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । प्रतिनिधी**

महाविकास आघाडी, इंडिया आघाडीच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार), मित्र पक्षाचे बीड लोकसभा मतदारसंघातील अधिकृत उमेदवार बजरंग मनोहर सोनवणे यांचे बर्दापूर जि.प.सर्कल तसेच अंबाजोगाई शहरात बळ वाढले असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात - (शरदचंद्र पवार) अनेकांनी जाहीर प्रवेश केला आहे. पक्षात प्रवेश करणाऱ्या सर्वांचे बीड जिल्हा पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे यांनी सहर्ष स्वागत केले. या तरूणांनी महाविकास आघाडीच्या बजरंग सोनवणे यांना निवडून आणण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (शरदचंद्र पवार) च्या वतीने जाहीर पक्ष प्रवेशाचे आयोजन अंबाजोगाई शहरातील डॉ.नरेंद्र काळे यांचे संपर्क कार्यालय येथे करण्यात आले होते. या प्रसंगी तालुक्यातील बर्दापूर सर्कल मधील माजी सरपंच, माजी उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य यांनी बीड जिल्हा पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे, केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे, प्रदेश उपाध्यक्ष बबनराव गित्ते, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार), पदवीधर संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ.नरेंद्र काळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच युवा नेते अमोल चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली २५ ते ३० प्रमुख कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (शरदचंद्र पवार) जाहीर प्रवेश केला. पक्षाच्या वतीने बीड जिल्हा पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे यांनी प्रवेश करणाऱ्या सर्वांचे स्वागत करून उपस्थितांना समायोचीत मार्गदर्शन केले. अमोल चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) मध्ये प्रवेश करणाऱ्या अनेकांनी त्यांचे मनोगत व्यक्त करताना, पक्ष नेतृत्वाच्या विश्वासाला आम्ही कदापीही तडा जाऊ देणार नाही.



एकेकाळी चहा विकणारे मोदीजी जर देशाचे पंतप्रधान होऊ शकतात. तर एका सामान्य शेतकऱ्याचा मुलगा, शेतकरीपुत्र बजरंग मनोहर सोनवणे हे बीड जिल्ह्याचे खासदार नक्कीच होवू शकतात..! असे विचार मांडले. व विजयाचा निर्धार व्यक्त केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षा (शरदचंद्र पवार) चे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.भारतीय जनता पक्षाच्या वतीने राज्यातील प्रादेशिक पक्षांची केलेली पक्ष फोडाफोडी आणि महाराष्ट्रातील सामान्य जनतेच्या पैशाचा केलेला अपहार आणि अशाच नेत्यांना दिलेली क्लीन चीट तसेच भ्रष्ट व दर्जाहीन राजकारणाला सर्व जनता आता कंटाळली आहे. शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, श्रमजीवी, कामगार आणि विद्यार्थी वर्गाला वेठीला धरले आहे. बेरोजगारी, महागाई प्रचंड प्रमाणात वाढली आहे. शेतकऱ्यांनी पिकविलेल्या शेतीमालाला हमीभाव नाही, तपास यंत्रणांचा गैरवापर करून दबावतंत्र वापरून राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हे पक्ष फोडून महायुती सत्तेवर आली आहे. बीड जिल्ह्यातील घराणेशाही, दडपशाही व दबावतंत्राच्या राजकारणाला यावेळी जनता कोणत्याही परिस्थितीत थारा देणार नाही. मी माझ्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन हा जिल्हा पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसमय (शरदचंद्र पवार) कसा करता येईल असे काम करणार आहे. त्यासाठी आपल्या सर्वांना मोठी मेहनत घ्यावी लागेल. माझ्यावर पवार साहेबांनी जो विश्वास दाखवून पक्षाचे कार्य करण्याचा आदेश दिला आहे. त्या आदेशाचे पालन प्रामाणिकपणे करण्याचा मी निर्धार केला आहे. असे चव्हाण यांनी स्पष्ट केले. बीड जिल्ह्यात आम्ही बदल घडवून आणू असे सांगून तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे बीड लोकसभा मतदारसंघातील अधिकृत उमेदवार बजरंग मनोहर सोनवणे यांना प्रचंड मतांनी विजयी करा.

# एकाच दिवसात २५ गावात आ.सुरेश धस यांच्या प्रचार दौऱ्याचा झंझावात

## आ.सुरेश धस यांचे उत्स्फूर्त स्वागत करून गावो गावी प्रचार सभेला प्रतिसाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**





बीड लोकसभा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ आमदार सुरेश धस हे सध्या आष्टी मतदारसंघात गाव,वाडी,वस्ती,तांडा इथपर्यंत मतदारांशी संवाद साधताना दिसत आहेत.याचाच एक भाग म्हणून शनिवारी पत्रकारांनी देखील आमदार सुरेश धस यांच्या दौऱ्यामध्ये सहभागी होत त्यांच्या दिनचर्याचा अनुभव घेतला.यामध्ये आमदार सुरेश धस हे गावातील प्रत्येक मतदारांशी संवाद साधताना पहावयास मिळत होते,तसेच सकाळी आठ वाजल्यापासून सुरू झालेला हा दौरा रात्री दहा वाजेपर्यंत अविरतपणे सुरू असल्याचे चित्र दिसून आले. यामध्ये गावो गावी आमदार सुरेश धस यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळताना पहावयास मिळत होता.यावेळी आ.सुरेश धस यांच्या गावोगावी झालेल्या कॉर्नर बैठकीतून त्यांनी उपस्थित तरुणांना सरकारने दिलेल्या १० टक्के आरक्षण आणि त्याचा जी आर आपण वाचला पाहिजे असे आवाहन केले.जेणेकरून यातून आपल्याला किती फायदा होतो आहे हे लक्षात येईल.शिवाय विरोधक विनाकारण भाजपा सत्तेवर आले की घटना बदलणार अशी आरोही ठोकत आहेत.मात्र कुणी ही संविधान बदलू शकत नाही हे खात्रीने सांगू इच्छितो.असे म्हणत धस यांनी महायुतीच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना जास्तीत जास्त मतदान करण्याचे आवाहन करत विनंती केली.दिवसभर शनिवारी साकत,लोणी (खुंटेफळ वा.), पिंपळा(काकडवाडी), सुंबेवाडी, ठोंबळसांगवी, हातोळण,पारोडी, खरडगव्हाण, सोलापूरवाडी, खुंटेफळ,वाहिरा, पिंपळगाव दाणी, मेहकरी, सराटेवडगाव, टाकळी (आ), शेरी खु.,शेरी बु.(खाकाळवाडी),मांडवा,बेलगाव,बीडसांगवी (गणगेवाडी/कणसेवाडी),देसुर,चिंचाळा या गावांना गाव दौरा करत प्रचार केला.पुढे बोलताना धस म्हणाले की,देशामध्ये पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी आपल्याला बीड लोकसभेच्या खासदारपदी विकासाभिमुख नेतृत्व असलेल्या पंकजा मुंडे यांना विराजमान करायचे आहे.विरोधकांच्या अफवांना बळी न पडता आणि त्यांच्या अफवांवर विश्वास न ठेवता ज्या पंकजा ताईनी पालकमंत्री असताना भरघोस निधी आपल्या मतदार संघाला उपलब्ध करून दिला,विविध योजना आपल्या मतदारसंघात राबविल्या गेल्या त्यामुळे अनेक विकास कामे या माध्यमातून राबविली गेली.अशा व्यक्तीला आपण मतदान केले पाहिजे.असे सांगत लोकशाहीत विनंती करून मतदान मागण्यासाठी आज आपल्याकडे आलो असल्याचे ही शेवटी धस म्हणाले.यावेळी कार्यक्रमाचे गटाचे नेते हनुमंत जंजिरे,माजी उपसभापती गोपाळभाऊ रक्ताटे,माजी सरपंच रिंकू बेलेकर,सरपंच विकास अमृते,माजी सरपंच संदीप चौधरी,माजी उपसरपंच उद्धव ससाणे,युवा नेते संभाजी शेंडगे,सरपंच सुभाष माळी,देवा धुमाळ,अशोक मुटकुळे,संतोष मुटकुळे,सीताराम वीर, रावसाहेब मुटकूळे,झुंबर श्रीखंडे,भाजपा नेते कल्याण पोकळे,माजी सरपंच बन्सीभाऊ पोकळे,माजी पंचायत समिती सदस्य किरण पोकळे, उधोजक प्रविण वारे,सरपंच तात्यासाहेब शिंदे,माजी उपसरपंच संजय पोकळे,अमृत पोकळे,सरपंच नंदकिशोर करांडे,उपसरपंच सदाशिव गणगे,घनशाम नरोडे, माजी सरपंच जालिंदर बाप्पू नरोडे,माजी सरपंच बबन करांडे,संपत ढोबळे,प्रशांत घुमरे,रामभाऊ गणगे,बाबासाहेब पानतावणे,बाबासाहेब शिंदे,संदीप करांडे,सुभाष गणगे आदींसह सर्व गावा सर्व प्रचारादरम्यान गाव भेटीतील प्रमुख कार्यकर्ते पदाधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.आमदार सुरेश धस यांच्यासोबत आज पत्रकारांनी देखील त्यांच्या प्रचार दौऱ्याचा संपूर्ण दिवसाचा तीन क्रम अनुभवला यामध्ये आमदार सुरेश धस हे प्रत्येक गाव गाव भेट देत असताना वेळेचे तर बंधन पाळतच होते शिवाय प्रचारामध्ये सामान्य कार्यकर्त्या सोबत जेवणाचा आस्वाद त्यांनी घेतला.मागील दोन दिवसात ५५ हून अधिक गावात आमदार सुरेश धस यांचा प्रचाराचा झंझावात दिसून आला.

# मतदानदिन हा सुटीचा नाही जिम्मेदारी दाखविण्याचा दिवस-सतिष उस्तुरे




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सुनिल बस्वराज हावा । उदगीर**

उदगीर येथील मातृभूमी प्रतिष्ठान शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित कस्तुराबाई नर्सिंग स्कूल आणि मातृभूमी महाविद्यालय मार्फत नवमतदार विद्यार्थ्यांची मतदार जनजागृती फेरी मतदानाच्या आदल्या दिवशी काढण्यात आली. या फेरीत ०७ मे हा दिवस सुट्टीचा नसून जिम्मेदारीचा आहे, सर्व मतदारांनी अवश्य मतदान करावे आणि आपली जिम्मेदारी पूर्ण करावी असे आवाहन करणारे फलक दाखवीत विद्यार्थ्यांनी शहरातून फेरी काढली .

मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी मतदानाच्या दिवशी असणारी सुट्टी ही प्रत्यक्षात आपल्याला जिम्मेदारी दाखवणारी असून या दिवशी प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क बजावावा आणि त्यानंतर आपली सुट्टी साजरी करावी असे मनोगत मातृभुमि महाविद्यालयात सुचविणारे फलक घेवून नव मतदारांनी जनजागृती काढली . यावेळी प्राचार्य उषा कुलकर्णी उस्तूरे ,प्राध्यापक बिभिशन मद्देवाड ,रेखा रणक्षेत्रे, आकाश राठोड ,दीपक कल्याणी , नवनाथ पंदे बालाजी जगताप यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# विजसेवा कित्येक तास राहते गुल,पण बिल मात्र येते महीना झाल की फुल

## वीज ग्राहक कायद्याची अंमलबजावणी कधी होणार?

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**



सद्या उन्हाची तीव्रता खूपच वाढली आहे दिवसा घराबाहेर पडणे अवघड झाले आणि अशाच प्रसंगी दिवसा व रात्री नेहमीच वीज पुरवठा खंडित होत असल्याने घरघुती वीज ग्राहक त्रस्त झाले असून वीज सेवा कित्येक तास गुल,वीज बिल मात्र वसूल करताहेत फुल अशी प्रतिक्रीया जनतेतून व्यक्त होत आहे.

तापमान वाढल्यामुळे प्रत्येक घरी कुलर पंखे याचा वापर वाढला पण ज्यावेळी हे वापरण्याची गरज असते त्याच वेळी कोणत्यातरी कामाच्या कारणाने वीज पुरवठा खंडित केला जातो.वीज ग्राहक कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी कोणीही लक्ष देत नाहीत.आणि वीजबिल वसुलीसाठी मात्र सारखं तगादा लावला जातो.

वीज वापर युनिट देखील भरमसाठ वाढवून दिले जाते विशेष म्हणजे जो तक्रार करतो त्यांचे काही युनिट कमी करून बिल कमी केले जाते आणि जे रेगुलर कोणतीही तक्रार दाखल न करता पैसे भरतात त्यांच्यावर मात्र अन्याय केला जातो.

भर उन्हाळ्यात वाढत्या तापमानामुळे नागरिक त्रस्त असतात त्यामुळे त्यांना विश्रांती घेण्यासाठी पंखा किंवा कुलर वापरावे लागतात पण त्याच वेळी वीज सेवा गुल होते आणि बघता बघता महिना आला की वीजबिल मात्र फुल येते .

सर्वसामान्य नागरिकांची होत असलेली लूट थांबवून नियमित सुरळीत वीज पुरवठा करण्यासाठी लक्ष घालण्यात यावे अशी मागणी जनतेतून होत आहे.

तसेच ज्या ज्या वीज ग्राहकांना वाढून बिले येत आहेत त्यांनी आपली रीतसर तक्रार दाखल करून जेवढी लाईट वापरली तेव्हढेच बिल भरून वीज ग्राहक कायद्याची मदत घ्यावी हे पण तेव्हढेच महत्वाचे बनले आहे.

# कंधार तालुक्यातील महादेव तांड्यातील ग्रामस्थांनी केले मतदान

## संतप्त झालेल्या ग्रामस्थांशी चर्चा करून;त्यांचे मनपरिवर्तन..!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



**लातूर लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी मंगळवार दि.७ मे रोजी मतदान झाले असून,सायंकाळी ५ वाजेपर्यंत ५५.३८ टक्के मतदान झाले होते.लोहा मतदासंघात ५५.७७ टक्के मतदान झाले,उन्हाचा चटका लक्षात घेता सकाळीच मतदारांनी मतदानासाठी रांगा लावल्या होत्या.**

कंधार तालुक्यातील 'ग्रामपंचायती अंतर्गत महादेव तांडा हे गाव ८० वर्षांपासून रस्ता होत,नसल्याने संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला होता; परंतु कंधार येथील तहसीलदारांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी मतदानापूर्वीच गावांत पोहोचले. ग्रामस्थांशी चर्चा केली. त्यांचे मन परिवर्तन केले.त्यानंतर ग्रामस्थही दि.७ मे रोज मंगळवारी होणाऱ्या मतदानासाठी तयार झाले आहेत.

ग्रामपंचायती अंतर्गत महादेव तांडा हे गाव आहे. ८० वर्षांपासून या गावाला जाण्यासाठी रस्ता नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. त्यांतच जोपर्यंत रस्ता होणार नाही, तोपर्यंत आम्ही मतदान करणार नाही. लोकसभेच्या मतदानावर बहिष्कार टाकू,असा इशारा दि.१२ मार्च रोजी येथील ग्रामस्थांनी तहसीलदारांना दिला होता.

ग्रामस्थांच्या या पवित्र्याची दखल घेऊन तहसीलदारांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार डी.डी. लोडे व तलाठी श्रीदेवी उत्सुर्ग यांनी दि.६ मे रोजी महादेव तांडा येथे जाऊन ग्रामस्थांशी चर्चा केली. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

गावाच्या रस्त्यासाठी आम्ही तोडगा काढू; पण तुम्ही मतदानावर टाकलेला बहिष्कार मागे घ्या, तुमच्या भावना वरिष्ठांपर्यंत पोहोचविल्या जातील अशी ग्वाही अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांना दिली,मतदानावर टाकलेला बहिष्कार मागे घ्यावा,अशी विनंती केली.मतदान करू; पण अधिकाऱ्यांनी केलेल्या मन परिवर्तनाला यश आले. ग्रामस्थ मतदानासाठी तयार झाले; पण ग्रामस्थांनी त्यासाठीही एक अट टाकली. लोकसभेपुरता टाकलेला बहिष्कार मागे घेऊ; परंतु त्यापुढेही रस्ता झाला नाही,तर येणाऱ्या विधानसभा, जिल्हा परिषद,पंचायत समिती आणि ग्रामपंचायत निवडणुकीच्या मतदानावर आमचा बहिष्कार कायम असेल असे ग्रामस्थांनी सांगितले. यावेळी राजीव राठोड, गुलाब चव्हाण, दिलीप राठोड, हरिचंद्र राठोड, अनिल राठोड, अनुसयाबाई राठोड, मुक्ताबाई राठोड आदी उपस्थित होते.अधिकाऱ्यांच्या विनंतीला मान देऊन ग्रामस्थांनी बहिष्कार मागे घेतला; परंतु येणाऱ्या निवडणुकीपूर्वी गावाला रस्ता करणेही अधिकाऱ्यांची जबाबदारी बनली आहे.

# अक्षय तृतीयेच्या दिवशी होणारे बालविवाह थांबवावेत-उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सुनिल बस्वराज हावा । उदगीर**



अक्षय तृतीयेच्या दिवशी मोठ्या प्रमाणात विवाह होतात. दि. १० मे, २०२४ रोजी अक्षय तृतीया असल्याने या दिवशी होणारे संभाव्य बालविवाहाच्या घटना रोखण्यासाठी सर्व यंत्रणांनी खबरदारी घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी आणि अक्षय तृतीयेच्या दिवशी होणारे बालविवाह थांबवावेत, असे आवाहन उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांनी केले आहे.

बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ संपूर्ण राज्यात लागू करण्यात आलेला आहे. तसेच त्याबाबतचे नियम महाराष्ट्र बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २०२२ देखील लागू करण्यात आलेला आहे. या नियमानुसार बालविवाह आयोजित करणे अजामीनपात्र गुन्हा आहे. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ नुसार बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना शहरी भागासाठी तर ग्रामीण भागासाठी ग्रामसेवकांना बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. तसेच ग्रामीण भागासाठी अंगणवाडी सेविका व शहरी भागासाठी पर्यवेक्षिका यांना सहाय्यक बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. उमरखेड विभागात अक्षय तृतीया या दिवशी बालविवाह होऊ शकतात. यास प्रतिबंध म्हणून आवश्यक त्या उपाय योजना करण्यात येतात. त्यानुसार एखाद्या पुरुषाने अल्पवयीन बाल वधुशी विवाह केल्यास त्या पुरुषाला दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद आणि एक लाख रुपयापर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. जाणीवपूर्वक बालविवाह ठरविणाऱ्यास, त्यासाठीचा सोहळा पार पाडणाऱ्यास किंवा प्रोत्साहन देणाऱ्यास दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद आणि एक लाख रुपयापर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. बालविवाह झाल्यास संबंधित वर व वधु यांचे आई-वडील किंवा पालक, अन्य नातेवाईक मित्र परिवार, विवाह विधी पार पाडणारे संबंधित व्यक्ती, फोटोग्राफर, प्रिंटींग प्रेस, वाजंत्री, सभागृह व्यवस्थापक, कॅटरिंग अशा बालविवाह घडविण्यास मदत करणाऱ्या सर्वांना दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद आणि एक लाख रुपयापर्यंत दंड होऊ शकतो. तसेच ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका यांनी जन्म दाखल्याची खोटी नोंद केल्यास त्यांच्यावरही कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांनी दिले आहेत.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904